# ७. गवताचे पाते

**वि. स. खांडेकर** (१८९८ ते १९७६ ) :

कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार, समीक्षक, पटकथालेखक. १९७४ साली ज्ञानपीठ पुरस्काराने खांडेकरांच्या वाङ्मयसेवेचा यथोचित गौरव करण्यात आला. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या पुरस्काराने सन्मानित केले.

त्यांचे 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'उल्का', 'दोन मने', 'हिरवा चाफा', 'रिकामा देव्हारा', 'पांढरे ढग', 'पहिले प्रेम', 'जळलेला मोहोर', 'ययाति', 'अमृतवेल' आणि 'अश्रु' या कादंबऱ्या; 'वायुलहरी', 'चांदण्यात सायंकाळ', 'अविनाश', 'मंदाकिनी' इत्यादी लघुनिबंधसंग्रह; 'वनभोजन', 'धुंधुर्मास', 'फुले आणि काटे', 'गोकर्णीची फुले', 'गोफ आणि गोफण' हे समीक्षा लेखसंग्रह इत्यादी लेखन प्रकाशित आहे.

रूपक कथा ही खांडेकरांची मराठी कथेला देणगी आहे. आपले जीवनविषयक तत्वज्ञान आणि आदर्श मूल्ये यांची मांडणी खांडेकरांनी रूपक कथांतून केली. 'सुवर्णकण', 'क्षितिजस्पर्श', 'वेचलेली फुले' हे त्यांचे रूपक कथासंग्रह आहेत. यांपैकी 'सुवर्णकण' हा खलील जिब्रान यांच्या रूपक कथांचा अनुवाद आहे. प्रस्तुत कथा ही त्यातीलच एक आहे. खांडेकरांनी सृष्टीतील पाने, गवताचे पाते या घटकांच्या रूपकांतून माणसाच्या विविध वृत्ती प्रवृत्तींचे, भावभावनांचे दर्शन या रूपक कथेतून घडवले आहे.

बालपणापासूनच आपणाला कथा खूप आवडतात. विज्ञान कथा, ऐतिहासिक कथा, जातक कथा, साहस कथा, रहस्य कथा असे कथेचे अनेक प्रकार आहेत. यांपैकी एक प्रकार म्हणजे रूपक कथा होय.

रूपक कथेचे वैशिष्ट्य म्हणजे ती आकाराने लहान असते. तिच्यात अर्थघनत्व, आशय समृद्धता आणि सूचकता असल्याने ती अधिक परिणामकारक होते. नाट्यात्मकता, आलंकारिकता आणि संदेशपरता ही रूपक कथेची आणखी काही वैशिष्ट्ये होत. रूपक कथेतून वाच्यार्थ क्षणोक्षणी अंशत: कमी होत जाऊन लक्ष्यार्थ प्रभावीपणे सूचित होतो. खालील कथा वाचून आपल्याला त्याचा अनुभव येईलच.

*हिवाळा नुकताच सुरू झालेला होता.*

*झाडावरून एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली.*

*पट...पट...पट...*

*त्यांचा तो पट...पट...असा कर्णकटू आवाज...*

*तो आवाज ऐकून धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले एक चिमणे गवताचे पाते जागे झाले. गिरक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला ते म्हणाले,*

*"पडता पडता किती कटकट करतोयस तू? तुझ्या या दंग्यानं माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की!"*

*पानाला राग आला. ते चिडून म्हणाले, "अरे जा! चिडखोर बिब्बा कुठला! मातीत जन्मून मातीतच लोळणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या या उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार? हा दंगा नाही, बेटा! हे गाणं चाललंय! जन्मात कधी आ न करणाऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला ते समजायचं नाही!" हे बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले.*

*ते पुन्हा जागे झाले, ते वसंताच्या संजीवक स्पर्शाने! त्या स्पर्शात विलक्षण जादू होती. त्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते. पुन्हा हिवाळा आला. थंडीने कुडकुडत गवताचे पाते धरणीमातेच्या कुशीत लपू लागले-झोपू लागले. पण पुन:पुन्हा त्याची झोपमोड होऊ लागली. जिकडे तिकडे झाडांवर पाने सळसळत होती...पट पट असा आवाज करीत पृथ्वीवर पडत होती!*

*ते गवताचे पाते कपाळाला आठी घालून स्वत:शीच पुटपुटले, 'काय ही हिवाळ्यातली पानं! जीव खाऊन टाकला यांनी अगदी! केवढा हा कर्णकटू आवाज...छी छी छी! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनी!'*

**रूपक कथेचा भावार्थ –**

अगदी साध्यासुध्या अशा नैसर्गिक गोष्टींतून मानवी स्वभावाचे विविध पैलू दिग्दर्शित करण्याचे लेखकाचे सामर्थ्य या कथेत सुंदर रीतीने प्रगट झाले आहे. गळून पडलेली पाने मातीत मिसळून जातात आणि पुढे त्या मातीतूनच गवताची चिमुकली पाती वर डोकावून पाहू लागतात. दोघांच्याही अंतरंगात खेळणारा जीवनरस एकच आहे; पण झाडावरून गळून पडणारे पान आपल्या उच्च पदाचा खोटा अभिमान बाळगून गवताच्या पात्याला क्षुद्र लेखते आणि त्या पडणाऱ्या पानाचा आवाज ऐकून आपली सुंदर स्वप्ने भंग पावल्याची तक्रार ते पातेही करत सुटते.

मानवी जीवनातले कितीतरी विसंवाद या साध्या विरोधात प्रतिबिंबित झाले आहेत. तरुण पिढीच्या बेजबाबदारपणाबद्दल बोलणारी वडील पिढी क्षणभर तरी आपल्या तरुणपणातले दिवस आठवते का? आठवण करून घेऊन मग तरुणांवर तोंडसुख घेण्याची तयारी दर्शवते काय?

...आणि वडील पिढीच्या सांगण्याकडे कपाळाला आठी घालून पाहणारी तरुण पिढी तरी प्रौढ झाल्यावर काय करते? तीही जुना कित्ताच गिरवत बसते! बाह्य स्वरूप कितीही बदलले, तरी त्याच त्याच मनोवृत्तीची पुनरावृत्ती होत असलेली दिसते आणि पिढीतील अंतर कायम राहते.

दुसऱ्याच्या जागी स्वत:ला कल्पून त्याचे सुखदु:ख जाणण्याची किंवा त्याच्याशी सहानुभूतीने समरस होण्याची प्रवृत्तीच मनुष्यात नाही. मालक आणि मजूर या दोघांच्या स्थानांची अदलाबदल केली, तर त्यांच्या स्वभावात काही बदल होईल का?

(सुवर्णकण)

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(१) रूपक कथेची वैशिष्ट्ये

(२) गवताच्या पात्याची स्वभाव वैशिष्ट्ये

(३) पानाची स्वभाव वैशिष्ट्ये

(४) गवताच्या पात्यासाठी पाठात आलेले शब्द व शब्दसमूह

**(२) कारणे लिहा.**

(अ) झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्यानं गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली, कारण ...........

(आ) 'अरसिक गवताच्या पात्याला गाणं समजणार नाही' असे गळून पडणारे पान म्हणाले, कारण ...........

(इ) वसंताच्या संजीवक स्पर्शाने पानाचे रूपांतर चिमुकल्या पात्यात झाले, कारण ...........

**(३) खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

(अ) बेजबाबदारपणा–

(आ) धरणीमाता–

(इ) बालपण–

**(४) खालील परिच्छेद वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून परिच्छेद पुन्हा लिहा.**

कुंभकोणम् येथील शाळेत गणिताचा सिद्धांत शिक्षक समजावून सांगत होते एखाद्या संख्येला त्याच संख्येने भागले असता भागाकार नेहमी एक येतो तेवढ्यात एक लहानसा मुलगा ताडकन उभा राहिला आणि म्हणाला गुरुजी तुमचा हा सिद्धांत थोडासा चुकीचा आहे ते म्हणाले तुझे म्हणणे स्पष्ट करून सांग पाहू यावर तो मुलगा धीटपणे म्हणाला सर शून्याला शून्याने भागले तर त्या चिमुरड्या मुलाचा हा प्रश्न ऐकताच त्या शिक्षकांना त्याच्या बुद्धिमत्तेचे विलक्षण आश्चर्य वाटले हा मुलगा म्हणजे पुढे श्रेष्ठ गणिती म्हणून प्रसिद्ध झालेले श्रीनिवास रामानुजन होय

**(५) खालीलपैकी कोणती जोडी विरुद्धार्थी नाही?**

(अ) ज्ञानी × सुज्ञ
(आ) निरर्थक × अर्थपूर्ण
(इ) ऐच्छिक × अनिवार्य
(ई) दुर्बोध × सुबोध

**(६) स्वमत.**

(अ) 'माणसातील ठरावीक मनोवृत्तीची पुनरावृत्ती वारंवार होत असते', हे पाठाच्या आधारे स्पष्ट करा.
(आ) गवताच्या पात्याच्या ठिकाणी तुम्ही असता, तर तुम्ही पानाला काय उत्तर दिले असते?
(इ) गवताचे पाते व पान यांच्या स्वभाववैशिष्ट्यांत बदल झाला आहे, अशी कल्पना करून कथेचे पुनर्लेखन करा.

**(७) खाली दिलेल्या रूपक कथेचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

''...एक विचारू?''
उगवून नुकतेच काही दिवस झालेलं रोप लगतच्या महावृक्षाला म्हणाले.
''हं.''
''मलाही तुमच्यासारखं मोठ्ठं व्हायचंय... पण..''
''पण माझ्या सावलीखाली आता ते शक्य नाही, हो ना?''
''...हो.''
''अरे! कितीतरी लहान लहान झाडंही खूप सुंदर असतात, आणि इतक्या..''
''पण वाढणं देखील सुंदरच असेल ना?''
''हो! आणि इतक्या उंचीवर आता खरं तर ही लहान झाडंच जास्त सुंदर दिसतात...''
...आणि महावृक्षाला दूरवर जंगलातून वाट काढीत येणारा एक लाकूडतोड्या दिसला!

**(गुलमोहर)**

**(टीप –** रूपक कथेचा भावार्थ परीक्षेकरिता समाविष्ट केलेला असल्याने तोही पाठाचा भाग म्हणून अभ्यासावा.**)**

CYTZ29